मार्च -२०२५ * अंक-९ वा

# अजिंठा
## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2024-25





आर.आय.प्रेसिडेंट
**रो. स्टेफनी अर्चिक**



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
**रो. राजिंदरसिंग खुराना**



प्रेसिडेंट
**रो. ॲड. सागर चित्रे**




ऑन.सेक्रेटरी
**रो. पराग अग्रवाल**



बुले.कमिटी चेअरमन
**रो. स्वाती ढाके**

THE MAGIC OF ROTARY

ROTARY CLUB OF OJAI 75th Anniversary 1948 - 2023




BACHPAN
CLUB THEME 2024-25

## संपादकीय....

सर्व बधूं भगिनींना रोटरी प्रणाम!

जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

रोटरी क्लब म्हणजे केवळ एक सामाजिक संघटना नसून, समाजसेवेच्या कार्यासाठी वाहून घेतलेली एक जबाबदारी आहे. आपली प्रत्येक कृती समाजाच्या उन्नतीसाठी असली पाहिजे. आजच्या वेगवान जीवनशैलीत, जबाबदारीची जाणीव असलेल्या व्यक्तींचे योगदान अधिक महत्त्वाचे ठरते. यावर्षी रोटरी ला इतके वर्ष पूर्ण होत आहे आपण आपले प्रांतपाल राजेंद्र खुराना सरांच्या मार्गदर्शनाखाली चार्टर्ड विक साजरा केला तसेच या महिन्यात आपल्या क्लबचा चार्ट डे सुद्धा आपण उत्साहात साजरा केला.

आपण विविध सेवा प्रकल्प राबवतो, गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करतो आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करतो. मात्र, हे कार्य करताना आपल्याला सतत आत्मपरीक्षण करावे लागेल – आपण समाजात किती प्रभावी फरक घडवू शकतो? आपल्यामुळे किती लोकांचे जीवन सुधारले? आपल्या पुढील पिढीला आपण कोणते मूल्य आणि संस्कार देत आहोत? रोटरीचे कार्य हे केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित नाही, तर समाजात एक जबाबदार नागरिक म्हणून कार्य करण्याचा संकल्प आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि महिला सशक्तीकरण यांसारख्या विविध क्षेत्रांत आपण योगदान देऊ शकतो. रोटरीच्या माध्यमातून आपण समाजाला एकत्र आणण्याचा, नव्या संधी निर्माण करण्याचा आणि समाजसेवेच्या नवीन संकल्पना रुजवण्याचा प्रयत्न करत असतो.

मार्च महिना हा आपण वॉटर सॅनिटेशन व हायजिन मंथ म्हणून साजरा करतो त्याबद्दल सविस्तर माहिती पान नंबर ५ वर दिलेली आहे. आपले ज्येष्ठ सदस्य स्व.मोहनशेठ अग्रवाल यांना श्रद्धांजलीपर लेख कॅप्टन कुलकर्णी सरांनी लिहिलेला पान नं. ७ वर आहे.

यंदाच्या वर्षी, आपण एकत्र येऊन अधिक ठोस पावले उचलूया. एक छोटा प्रयत्नही मोठ्या बदलाला सुरुवात करू शकतो. चला, समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकत्र येऊ .

**– रो. स्वाती ढाके**

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम,

मित्रांनो, मार्च महिना हा जल स्वच्छता व आरोग्य अभियान म्हणून डेसीग्नेटेड मंथ आहे. त्या अनुषंगाने आपण प्रोजेक्ट घेणार आहोत. तसेच फेब्रुवारी महिना हा आपल्या क्लबसाठी विशेष महिना आहे. ह्या महिन्यात दरवर्षी आपण आपल्या क्लबचा वाढदिवस खूप मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा करतो.

ह्या वर्षी ही आपण आपल्या क्लबचा चार्टर डे उत्साहाने साजरा केला. फक्त चार्टर डे नाही तर चार्टर वीक म्हणून आपल्या क्लबने वेगवेगळे उपक्रम राबविले. चार्टर डे च्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून आपल्या डीजीएनडी रो.किशोर राठी, नागपूर यांचा सहवास लाभला व त्यांनी आपल्या क्लबला मार्गदर्शन व ७५ वर्ष पूर्ण केल्यावर अभिनंदन सुद्धा केले. हा महिना आपल्या क्लबने रेकॉर्ड ब्रेकींग ११ सर्व्हीस प्रोजेक्टस् घेतले. त्यासाठी सर्व सदस्यांचा मन:पूर्वक अभिनंदन! बॉलीवूड नाईट ह्या कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्या क्लबचे सदस्यांचे कलात्मक गुण सगळ्यांच्या समोर आले व सगळ्यांनी त्यात आनंद घेतला.

शेवटी माझे जिना यहा मरना यहाँ या गाण्याचे परफॉरमन्स वर सिनिअर रोटेरीअरन्सच्या डोळ्यात आनंदाश्रु आले होते.

रोटरीचा फेब्रुवारी महिना हा पीस बिल्डींग ॲन्ड कन्फ्लीक्ट प्रीव्हेशन डिसेग्नेटेड महिना असल्याने आपण श्री.बरुन मित्रा यांचे व्याख्यान आयोजित केलेले होते.

**– रो. ॲड. सागर**

# फेब्रुवारी महिन्यातील साप्ताहिक सभा





✲ ७ फेब्रुवारी – रोजी आयोजित साप्ताहिक सभे मध्ये आपल्या क्लबचा चार्टर डे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डीजेएनडी किशोर रोठी यांनी आपल्या क्लबच्या कार्याचे कौतुक करत सर्वांना मार्गदर्शन केले.




✲ १४ फेब्रुवारी – रोजी आयोजित साप्ताहिक सभा बिजनेस मिटींग होती. या मिटींगमध्ये प्रांतपाल राजेंद्र खुराना सरांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे चार्टर्ड विक विविध प्रोजेक्ट करून साजरा करणे या विषयावर चर्चा करण्यात आली.



✲ २१ फेब्रुवारी – रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही फॅमिली मीटींग होती. यावेळेस अ नाईट टू रिमेंबर द गोल्डन इरा ऑफ बॉलीवूड या विषयावर मनोरंजनात्मक कार्यक्रम आपल्याच क्लबच्या रोटरी सदस्यांनी साजरा केला.



✲ २८ फेब्रुवारी – रोजी आयोजित साप्ताहिक सभा फेब्रुवारी महिना हा पीस बिल्डींग ॲन्ड कन्फ्लीक्ट प्रीव्हेशन डिसेग्नेटेड महिना असल्याने आपण श्री.बरून मित्रा यांचे व्याख्यान आयोजित केलेले होते.

# फेब्रुवारी महिन्यातील प्रोजेक्टस्

✻ **३ व ४ फेब्रुवारी–** रोजी रोटरी क्लब जळगाव व एस.एस.मणियार लॉ कॉलेज जळगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने 'कायद्याची साक्षरता' या विषयावर रेल्वे स्टेशनवर पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे पदाधिकारी तसेच लॉ कॉलेजचे विद्यार्थी व शिक्षक तसेच रेल्वे स्टेशनवरील पदाधिकारी उपस्थित होते. तसेच ४ फेब्रुवारी ला ''कायद्याची जागरूकता'' या विषयावर काव्यरत्नावली चौकात पथनाट्य सादर करण्यात आले.










✻ **७ फेब्रुवारी –** रोजी रोटरी क्लब जळगाव येथील हॉलवर आय.एम.आर. कॉलेजच्या रोटरॅक्ट क्लबच्या विद्यार्थ्यांनी स्टुडंट पार्लमेंट आयोजित केली होती.

✻ **१३फेब्रुवारी–** रोजी समता नगर येथील आनंदघर येथे ई–लर्निंग कमिटी तर्फे कॉम्प्युटर देण्यात आला. रो.दिपीका व रो.दिपक चांदोरकर यांनी या कॉम्प्युटरचे प्रायोजकत्व घेतले. यावेळी अध्यक्ष रो.सागर चित्रे, मा.सचिव पराग अग्रवाल तसेच ई–लर्निंग कमिटी चेअरमन रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, पी.पी.रो.कॅप्टन कुलकर्णी, रो.दिपीका चांदोरकर व रो.दिपक चांदोरकर तसेच आनंदघरच्या संचालिका प्रणाली सिसोदीया उपस्थित होत्या.






✻ **१७ फेब्रुवारी –** रोजी रोटरी वीक सेलीब्रेशन अंतर्गत महाराणा प्रताप शाळेतील विद्यार्थ्यांचे डोळ्यांची तपासणी करण्यात आली. विष्णुलीला डोळ्यांचे हॉस्पीटल येथे कॅटरॅक्ट सर्जरी करण्यात आली. दोन्ही प्रोजेक्टसाठी माजी अध्यक्ष रो.डॉ.तुषार फिरके यांनी परिश्रम घेतले.

✻ **२० फेब्रुवारी–** रोजी रोटरी क्लब व एस.एस.मणियार विधी महाविद्यालय मार्फत जनजागृतीपर पथनाट्य स्वातंत्र्य चौक, महात्मा गांधी उद्यान जवळ वाहतुकीचे नियम व रोड सेप्टी या विषयावर आयोजित करण्यात आले होते.



# रोटरी वीक सेलीब्रेशन




१६ फेब्रु.– जिल्हा परिषद प्रायमरी स्कूल बेळी, नशिराबाद येथे टॉयलेट ब्लॉक अनावरण




१७ फेब्रु.– रोटरी वीक सेलीब्रेशन अंतर्गत पिंक रिक्षा धारक महिलांना लायसन्स् व ट्रेनिंग सेशन




१७ फेब्रु.– नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालय येथे गुड टच बॅड टच बाबत डॉ.माधुरी कासट यांचे व्याख्यान




१८ फेब्रु.– समता नगर येथील आनंदघर येथे अवेअरनेस टॉक आयोजित करण्यात आला होता.



१८ फेब्रु.– छत्रपती संभाजी राजे नाट्यगृहाजवळील भाजी बाजारात कापडच्याच्या पिशव्यांचे वाटप



१९ फेब्रु.– एस.टी.बस स्टॅन्ड येथे कामगारांचा जनरल चेकअप



१९ फेब्रु.– जिल्हा परिषद प्रायमरी स्कूल बेळी, नशिराबाद येथे वृक्षारोपण करण्यात आले.



२२ फेब्रु.– डॉ.सई नेमाडे यांचे 'थॅलेसेमिया' या आजाराविषयी सेमिनार आयोजित करण्यात आला.

# जल, स्वच्छता आणि आरोग्य अभियान

रोटरी इंटरनॅशनल दरवर्षी विविध विषयांना प्राधान्य देत समाजहितासाठी काम करते. मार्च महिना 'जल, स्वच्छता आणि आरोग्य' या संकल्पनेसाठी समर्पित आहे. पाणी हा जीवनाचा मूलभूत घटक आहे आणि त्याचबरोबर स्वच्छता व आरोग्य यांचेही महत्त्व तितकेच आहे.

**पाण्याचे महत्त्व आणि त्याचे व्यवस्थापन**

पाणी ही पृथ्वीवरील सर्व सजीवांसाठी अनिवार्य गरज आहे. मात्र, वाढत्या लोकसंख्येमुळे आणि अव्यवस्थित वापरामुळे पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. जलसंधारण, पुनर्वापर, वर्षाजल संकलन यासारख्या उपाययोजनांद्वारे आपण भविष्यातील पाणीटंचाई टाळू शकतो. रोटरी क्लब विविध भागांमध्ये जलसंधारण प्रकल्प राबवून या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

**स्वच्छता आणि तिची गरज**

स्वच्छता ही निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे. अनेक आजार हे अपूर्ण स्वच्छतेमुळे पसरतात. स्वच्छतेच्या सवयी अंगिकारल्यास आरोग्य सुधारू शकते. शौचालय वापरणे, स्वच्छ पाणी पिणे आणि कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे यासारख्या गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. रोटरी क्लब ग्रामीण आणि शहरी भागात स्वच्छता मोहिमा राबवून समाजप्रबोधन करतो.

**आरोग्याची काळजी आणि हायजिनचे महत्त्व**

हात धुणे, स्वच्छ कपडे परिधान करणे, स्वच्छ परिसर राखणे या सवयींमुळे संसर्गजन्य रोगांपासून बचाव करता येतो. रोटरी विविध ठिकाणी हात धुण्याचे प्रबोधन, शाळांमध्ये हायजिन कार्यक्रम आणि आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करतो. विशेषतः मुलांसाठी आणि महिलांसाठी स्वच्छतेचे महत्त्व समजावणे गरजेचे आहे.

**रोटरीच्या योगदानाची गरज**

रोटरी क्लब संपूर्ण जगभरात पाणी, स्वच्छता आणि आरोग्याशी संबंधित उपक्रम राबवतो. शाळांमध्ये हात धुण्याच्या सुविधा उपलब्ध करून देणे, शौचालये बांधणे, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय करणे यासारख्या अनेक कार्यांमध्ये रोटरी महत्त्वाची भूमिका बजावतो. स्थानिक प्रशासन व नागरिकांनी रोटरीच्या या उपक्रमांना सहकार्य केल्यास समाज आरोग्यदृष्ट्या सक्षम होईल.

**आपण काय करू शकतो?**

- पाण्याचा जपून वापर करा आणि जलसंधारणाच्या उपाययोजना राबवा.
- घर, कार्यालय व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखा.
- मुलांना स्वच्छतेच्या चांगल्या सवयी शिकवा.
- आरोग्य तपासणी शिबिरांमध्ये सहभागी व्हा.
- रोटरीच्या उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घ्या.

मार्च महिन्यात रोटरी क्लबच्या माध्यमातून आपण जल, स्वच्छता आणि आरोग्य या विषयांना हात घालून एक निरोगी आणि स्वच्छ समाज निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. चला, आपण सर्व मिळून या अभियानात सहभागी होऊया आणि समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल उचलूया!

# इतिहासातील सुवर्ण पान

**पी.पी. रो. पुनम मानुधने**



रो. मा.अध्यक्षा पुनम मानधने मॅडम यांना जिल्ह्यातील पहिल्या महिला अध्यक्षा तर रोटरी डिस्ट्रिक्ट मधील दुसऱ्या महिला अध्यक्षा असल्याचा बहुमान मिळालेला आहे. पीडीजी डॉ. चंद्रशेखर सिकची यांच्या सामाजिक सेवेपासून प्रेरित होऊन त्यांनी १९९० साली त्यानी रोटरी परिवारात प्रवेश केला .त्याच वर्षी मा.स्व. आप्पासाहेब खांबेटे यांनी साप्ताहिक बुलेटीनची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. अवघ्या सात वर्षानंतर त्या १९९७ –९८ साली रोटरी क्लब जळगावच्या अध्यक्षा बनल्या. इतर रोटरी क्लब, इनर व्हील क्लब, यांच्या सभासदांची सतत संपर्क साधून, चर्चा करून व विचार विनिमय करून ,त्यांनी बरेच प्रोजेक्ट एकत्रित घेतले .त्यातील काही पुढील प्रमाणे :– इंटरॅक्ट क्लब क्रिकेट मॅच, जॉईन फ्लॅग होस्टिंग ऑन १५ ऑगस्ट, फेलोशिप दांडिया ९७, प्लस पोलिओ अवरनेस रॅली 'रोटरी इन्फॉर्मेशन एक्झिबिशन' व. वा. वाचनालय येथे आयोजित करण्यात आले. याशिवाय सर्व क्लब ने मिळून स्वदेशी चळवळीचे श्री राजीव दीक्षित यांचे व मु.जे. विद्यालयाच्या सहकार्याने डॉ. अभय बंग यांचे' माझा हृदय विकार व मी 'या विषयावर दोन पब्लिक लेक्चर आयोजित केले गेले. लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. पुणे येथील बाल भवनच्या डॉ. शोभाताई भागवत यांच्या सहकार्याने घेतलेले दोन दिवसीय बाल संस्कार शिबिर व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरता आयोजित केलेले करियर गायडन्स शिबिर हे ही संस्मरणीय ठरले .तसेच सर्वात जास्त यशस्वी झालेला मेडिकल प्रोजेक्ट म्हणजे विशाखापट्टम येथील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ.आदिनारायण राव व त्यांचे सहकारी यांच्या मदतीने 'पोलिओ करेक्टिव्ह सर्जरी कॅम्प, सिविल हॉस्पिटल च्या सहकार्याने घेण्यात आला. यात १२० शस्त्रक्रिया करण्यात आल्या .आपल्या क्लब मधील सर्व सदस्यांनी न थकता सर्व व्यवस्था अतिशय उत्तमरित्या सांभाळली .सर्वांची साथ असल्याने एवढा मोठा प्रोजेक्ट घेता आला, असे ते आवर्जून नमूद करतात. रोटरी क्लबचे अध्यक्ष होणे ही जीवनातील एक सुवर्णसंधी आहे ती प्रत्येक रोटेरियन्स ने जरूर अनुभवावी हे त्या नवीन रोटेरियन्सला सांगतात.













# भावपूर्ण श्रद्धांजली

पी.पी. रो. कॅप्टन कुलकर्णी



स्व.मोहनशेठ अग्रवाल



आपल्या क्लबचे एक वरीष्ठ सदस्य मोहनशेठ अग्रवाल यांचे दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी दु:खद निधन झाल्याचे कळताच अपाल्याच क्लब मध्ये नाहीतर जळगावातील सगळ्याच रोटरी क्लब मध्ये हळहळ व्यक्त केली गेली.

स्व.मोहनशेठ अग्रवाल, आम्ही त्यांना मोहन काकाच म्हणायचो. आपल्या क्लबच्या माध्यमातून एप्रिल १९७६ ला रोटरी परिवारात सामील झाले. आपल्या क्लबचे सगळे प्रोजेक्ट्स् मध्ये मग ते मेडीकल अथवा नॉन मेडीकल प्रोजेक्टस् असो, नेहमीच त्यांनी सर्वतोपरी मदत केली आणि नेहमीच सक्रीय राहिले. माझे वडील रो.डॉ.बी.व्ही.कुलकर्णी आणि मोहनकाकांची विशेष मैत्री असल्याने आमचे खूपच घनिष्ठ संबंध होते. जळगावातील ते एक अग्रगण्य व्यावसायीक होते. आपल्या क्लब मधील तरूण सदस्यांची नेहमी आपुलकीने चौकशी करत. त्यांची सदैव हसतमुख असलेली छबी विसरणे शक्यच नाही. त्यांच्या पत्नी श्रीमती लीला काकी या पण इनरव्हील च्या माजी अध्यक्षा राहिल्या असून त्याही समाजकार्यात नेहमीच सक्रीय राहिल्या आहेत. मी आपल्या क्लबचा २०१९-२० मध्ये अध्यक्ष असतांना मोहनकाकांचे चिरंजीव रो.अनिलभाई अग्रवाल आपल्या क्लबचे असि.गव्हर्नर होते. याचा त्यांना खूप अभिमान वाटत असे. प्रत्येक सदस्याला ते वाढदिवसाच्या शुभेच्छा स्वत: फोन करून देत असत. खरेच असे उत्तुंग व्यक्तीमत्त्व असलेल्या मोहनकाका अग्रवाल यांना विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली.

# कमिटी चेअरमन - २०२५-२०२६

| अ.नं. | कमिटीचे नाव | कमिटी चेअरमनचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रोग्राम कमिटी | रो.स्वाती ढाके |
| २ | मेडीकल कमिटी | रो.डॉ.जयंत जहागीरदार |
| ३ | नॉन मेडीकल कमिटी | रो.संदीप शर्मा |
| ४ | मेंबरशिप कमिटी | रो.राघवेंद्र काबरा |
| ५ | फाऊंडेशन कमिटी | रो.जितेंद्र ढाके |
| ६ | पब्लीक इमेज कमिटी | रो.राजेश यावलकर |
| ७ | ग्लोबल ग्रँट कमिटी | रो.डॉ.प्रदीप जोशी |
| ८ | फंड रायझिंग कमिटी | रो.प्रदीप खिवसरा |
| ९ | सीएसआर कमिटी | रो.मनोज जोशी |
| १० | लेक्चर सिरीज कमिटी | रो.नितीन पाटील |
| ११ | वर्कशॉप कमिटी | रो.मकरंद डबीर |
| १२ | इंटरॅक्ट कमिटी | रो.डॉ.काजल फिरके |
| १३ | इंटरॅक्ट कमिटी | रो.प्राग अग्रवाल |
| १४ | व्होकेशनल कमिटी | रो.राजेश वेद |
| १५ | लिटरसी कमिटी | रो.शुभदा कुलकर्णी |

| अ.नं. | कमिटीचे नाव | कमिटी चेअरमनचे नाव |
|---|---|---|
| १६ | ई-लर्निंग कमिटी | रो.ॲड.महेश भोकरीकर |
| १७ | इन्व्हारमेंट कमिटी | रो.राकेश चव्हाण |
| १८ | बुलेटीन कमिटी | रो.कॅ. मोहन कुलकर्णी |
| १९ | अटेंडेस कमिटी | रो.डॉ.महेश पाटील |
| २० | ग्रीटींग कमिटी | रो.केदारनाथ मुंदडा |
| २१ | लिगल ॲड कमिटी | रो.ॲड.श्रीकांत भुसारी |
| २२ | ७x७x७ कमिटी | रो.सुभाष सराफ |
| २३ | आरसीसी कमिटी | रो.ॲड.प्रविणचंद्र जंगले |
| २४ | रोटा किडस् कमिटी | रो.चैताली चौधरी |
| २५ | वॉश ॲन्ड विन्स् कमिटी | रो.डॉ.पवन बजाज |
| २६ | फेलोशिप कमिटी | रो.रितेश जैन |
| २७ | स्पोर्टस् कमिटी | रो.चंदन महाजन |
| २८ | युथ कमिटी | रो.ॲड.आनंद मुजुमदार |
| २९ | कॉन्फरन्स कमिटी | रो.उदय पोतदार |
| ३० | ऑगन डोनेशन कमिटी | रो.डॉ.सुनिल सुर्यवंशी |

## जीवेत् शरदः शतम्..!

| | |
|---|---|
| १) २२ मार्च | पी.पी. रो. छबीलदास शहा |
| २) २३ मार्च | पी.पी. रो. किशोर मंडोरा |
| ३) २६ मार्च | पी.पी. रो. डॉ. प्रदीप जोशी |
| ४) ३० मार्च | रो. स्वाती ढाके |

## नांदा सौख्यभरे...

| | |
|---|---|
| १) १ मार्च | रो.प्रज्ञा व पीपी.रो.प्रविण जंगले |
| २) ३ मार्च | पीपी रो.डॉ.जयंत जहागिरदार |
| ३) ३ मार्च | रो. राजेश वेद |
| ४) ५ मार्च | रो. किरण बेंडाळे |
| ५) ८ मार्च | रो. आकाश डोकानिया |
| ६) ११ मार्च | रो. सुभाष अमळनेरकर |
| ७) १७ मार्च | रो. आशुतोष पाटील |
| ८) १८ मार्च | रो. ॲड. श्रीकांत भुसारी |

## मार्च महिन्यातील कॅप्टन

सदर कॅप्टन यांनी मार्च महिन्यात क्लबच्या सर्व कमिटी चेअरमन यांचेशी समन्वय साधून त्यांच्या कामात मदत करणे.



**पी.पी.रो.जितेंद्र ढाके**



**पी.पी.रो.डॉ.जयंत जहागीरदार**

## अभिनंदन!

✻ रो.डॉ.शशिकांत गाजरे यांना वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट कार्या बद्दल 'लेवा आयकॉन' या पुरस्काराने स्मानित करण्यात आले.

✻ रो.डॉ.हेमंत बाविस्कर यांची भारत नामक ब्युरोच्या आयुर्वेद समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

✻ रो. आशुतोष पाटील यांना एक्सलन्स ॲवार्ड ने सन्मानित करण्यात आले.

✻ रो.ॲड.हेमंत भंगाळे यांना ''राष्ट्रीय न्यायदीप विधी सम्राट'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.